**सरकारतर्फे सा.क्र.४**

**शपथेवर**

माझे नांव : गणेश देवराम कुदनर,

वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी,

सध्या राहणार : नेवासा, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

**सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू** —

१. पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता कोठेही बोलावले नव्हते. मी रस्त्यावरून जाताना त्यांनी माझी सही घेतली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझी सही आहे. मी घटनास्थळ पंचनामा वाचला नव्हता, न वाचता फक्त सही केली होती. त्यामुळे पंचनाम्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस **निशाणी ४५** देण्यात येते. माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा करण्यात आला नव्हता.**(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे त्यास भारतीय पुरावा कायदा १८७२ कलम १५४ प्रमाणे पुरावा घेण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की,दि.२०/०१/२०१९ रोजी कांगोणी गावाच्या हद्दीतील सविता कर्जुले यांच्या राहत्या घरासमोर बोलवले होते.हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाण हे मला सविता कर्जुले यांनी दाखवले होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाण हे सविता कर्जुले यांच्या राहत्या घरामध्ये होते.हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष घटनास्थळी तयार केला, मला वाचुन दाखविला व मग मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**आरोपींतर्फे विद्वान वकिल श्री. एन. एस. जोशी यांनी उलटतपास नाकारला.**

**उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

**स्वाक्षरीत/—**

(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४, नेवासा

दिनांक :२७/११/२०२५